जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२२/०९/२०२४

## दि.२१/०९/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४८३/२०२४,भारतीय न्याय सहिता कलम ३०५,३३१(४) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५२ वर्षे, रा.हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/०९/२०२४ रोजी रात्री २२/०० ते दिनांक २१/०९/२०२४ रोजी सकाळी ०५/०० वाजताचे दरम्यान सर्वे नं ३७, लेन नं ४, ओकांर कॉलनी, काळेपडळ, हडपसर, पुणे, लेन नं ३ ओकांर कॉलनी, काळेपडळ,हडपसर,पुणे,श्री.जंगले यांच्या ऑफिसच्या समोरील गणपती मंदिर,काळेपडळ हडपसर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहत्या घराच्या लोखंडी गेटच्या सेप्टी डोअरच्या व मेनडोरच्या लॉकची कडी तोडुन आत मध्ये प्रवेश करुन घरातील गोदरेजच्या कपाटातील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले रोख २,५०,०००/-रुपये,सोन्याचे दागिने असा १२,६४,०००/- रुपये व त्यांचे घराशेजारी राहणा-या महिला यांच्या घरातुन रोख २,५००/-रुपये व फिर्यादी यांचे घरापासुन जवळच असलेल्या गणपती मंदिराच्या दानपेटीच्या लॉकची कडी तोडुन दानपेटीतील रोख अंदाजे १०,०००/-रुपये व चांदीचे दागिने असा एकुण अंदाजे १२,८१,५००/-रुपये किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा पो.निरी. प्रविण अब्दागिरे, मो.नं.८२७५४७३५४९ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३१०/२०२४, भा.न्या.सं.कलम १०६(१),२८१,१२५ बी,मो.वा.का.कलम १८४ |
| **फिर्यादी** | शब्बीर बाबा शेख,पोलीस उप निरीक्षक विश्रांतवाडी पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपीत** | फैजल सलिम सय्यद, वय २० वर्षे, रा.येरवडा पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/०९/२०२२ रोजी दुपारी १२/१५ वा. सूमारास वेलनेस मेडीकलसमोर टँक रोड शांतीनगर येरवडा पुणे. |
| **तपशिल** | विश्रांतवाडी पो.स्टे.अकस्मात मयत रजि.नं.१३८/२०२४ अन्वये झाले तपासा वरुन यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिल्यात की, यातील नमुद मयत इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,त्याच्या समोर जात असलेल्या टीव्हीएस ज्युपीटर गाडीस पाठीमागुन धडक देवुन तसेच समोरुन येत असलेल्या होंडा अँक्टीवा मोटार सायकलाला जोरात धडक देवुन स्वतःस गंभीर जखमी होऊन स्वतःच्या मृत्यूस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुधा चौधरी मो.नं.९५५२५३४१७८ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४८२/२०२४,भारतीय न्याय सहिता कलम १२१(१),१३२,११५(२),३५१(२), ३५२,३(५) |
| **फिर्यादी** | सागर दत्तात्रय सुर्यवंशी, पो.अमंलदार नेमणुक हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | १)स्वरनिल दिनेश सुरवाडे वय २० वर्षे रा म्हसोबा मंदिराजवळ,काळेपडळ, २) पुजा दिनेश सुरवाडे वय २५ वर्षे रा.सदर (अटक) |

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२१/०९/२०२४ रोजी १०/४५ वा.च्या सुमारास तुकाई टेकडी,तुकाई पोलीस चौकी, फुरसुंगी, पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हे जुनी म्हाडा कॉलनी येथे ईद ए मिलाद मिरवणुकीच्या अनुशंगाने भेट देण्यासाठी जात असताना तुकाई टेकडी येथे एक मुलगा हा एका मुलीचा हात ओढताना दिसला म्हणुन फिर्यादी यांनी महिलांच्या सुरक्षीतेच्या दृष्टीकोनातून नमुद इसमा कडे चौकशी केल्याच्या रागातून त्यानें फिर्यादी यांना शिविगाळ करुन दमदाटी केली तसेच त्याने त्याचे नाव न सांगितल्याने त्यास चौकशी कामी पोलीस चौकी येथे बोलावले असता सदर ठिकाणीही म्यांनी शिविगाळ केली. त्यावेळी पो.शि.शेलार यांनी त्यास शिविगाळ करु नको असे सांगितले असता त्यांना ही त्याने शिविगाळ करुन धक्काबुक्की केली त्यानंतर नमुद इसमाची बहिण हिनेही तुकाई पोलीस चौकी येथे येवून शिविगाळ करुन सरकारी कामात अडथळा आणला

**त.अंमलदार** पो.उप.निरी. विनोद पवार मो.नं.८७८८२३२४१९

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुश्रृंगी पो स्टे ७५९/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३१९(२),३१८(४),३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(डी)

**फिर्यादी** एक इसम रा.पाषाण पुणे

**आरोपीत** मोबाईल धारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२९/२/२०२४ रोजी ते आजपावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यानी लिंक पाठवुन त्याद्वारे अकाऊंट क्रियेट करुन जास्तीत जास्त रेटींग देण्याचे टास्क देवुन ते पुर्ण केल्यास चांगला नफा मिळेल असे आमिष दाखवुन सुरवातीस थोडया प्रमाणात नफा देवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून प्रीपेड टास्क करिता व सदर टास्क करिता भरलेली रक्कम ब्लॉक झाल्याचे सांगुन ती अनब्लॉक करण्याकरिता वेगवेगळी कारणे सांगुन फिर्यादी यांचे विविध बँक खाते मधुन त्यांचे विविध बँक खाते व गुगल पे ट्रान्झॅक्शन बेनिफिशअरी बँक खाते धारक यामध्ये एकुण रक्कम ८,१८,०८४ /-रूपये भरण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) श्री.पाटील मो.नं.८१०८८००३८१

## <u>दि.२२/०९/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दुपारी १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

## <u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सहकारनगर पो स्टे ३१०/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम १०६,२८१ मोटार वाहन कायदा कलम १८४,११९/१७७

**फिर्यादी** राहुल भास्कर हजारे, पो.अमंलदार नेमणुक सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

**आरोपीत** कुणाल सुर्यकांत बडदे वय २४ वर्षे रा.सदानंद नगर मंगळवार पेठ,पुणे (मयत)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २१/०९/२०२४ रोजी अंदाजे दुपारी १६/३० वाजेचा सुमारास,सदु शिंदे स्टेडियम जवळ तळजाई पुणे

**तपशिल** यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, स्वःताचे अगर दुस-याच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने चालवुन स्वःता गाडी स्लीप होऊन खाली पडून गंभीर जखमी होऊन स्वःताचे मृत्युस कारणीभुत झाला

**त.अंमलदार** पो.अमंलदार. व्ही.आर.एडके मो.नं..९९२३६९६५३९

**२**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सहकारनगर पो स्टे ३०९/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम २२३,२८५,२८९,२९२,२९३ सह पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ चे कलम १५ सह ध्वनी प्रदूषन विनियमन व नियंत्रण २००० चे कलम ३,४,५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम चे कलम ३३/१३१,३६/१३४, ३७/१३५, ६८/१४०

**फिर्यादी** बबलु दत्तात्रय भिसे पो.अमंलदार नेमणुक सहकारनगर पोलीस ठाणे ,पुणे शहर

**आरोपीत** १)श्री.अखिल गुरुदत्त तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष २) लाउड स्पीकर चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १७/०९/२०२४ रोजी सायंकाळी १९/५७ वा.चे सुमारास बालाजीनगर पुणे येथे,

**तपशिल** दिनांक १७/०९/२०२४ रोजी अखिल गुरुदत्त तरुण मित्र मंडळ बालाजीनगर, धनकवडी पुणे या मंडळाचे अध्यक्ष यांनी मोठया प्रमाणात लाऊडस्पिकर आणुन ते लाऊडस्पिकर चालका कडुन कोणतीही पुर्व परवानगी न घेता व दिलेल्या आदेशाचे/सुचनांचे उल्लंघन करुन गणपती उत्सव साजरा करण्यासाठी साऊंड सिस्टीमचा वापर करून आवाजाची मर्यादा ओलांडली डॉल्बी सिस्टीमवर गाणी वाजवुन,सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करून,यंत्र सामुग्रीबाबत हयगयीचे वर्तन केले व येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडथळा करून धोका निर्माण केला आहे. तसेच त्यांनी विहीत क्षमतेचे उल्लंघन न करणेबाबत नोटीस घेणेस नकार देवुन अटी शर्तींचा भंग केला म्हणुन यांचेविरुध्द सरकारतर्फे तक्रार आहे.

**त.अंमलदार** पो.अमंलदार डी.व्ही.धोत्रे मो.नं.९३०९८६०३२९

**३**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सहकारनगर पो स्टे ३०८/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम २२३,२८५,२८९,२९२,२९३ सह पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ चे कलम १५ सह ध्वनी प्रदूषन विनियमन व नियंत्रण २००० चे कलम ३,४,५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम चे कलम ३३/१३१,३६/१३४,३७/१३५, ६८/१४०

**फिर्यादी** बबलु दत्तात्रय भिसे पो.अमंलदार नेमणुक सहकारनगर पोलीस ठाणे ,पुणे शहर

**आरोपीत** १)शिवतीर्थ मित्र मंडळाचे अध्यक्ष २) लाउड स्पीकर चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १७/०९/२०२४ रोजी सायंकाळी १८/३५ वा चे सुमारास बालाजीनगर पुणे

**तपशिल** दिनांक १७/०९/२०२४ रोजी सायकांळी १८/३५ वाजता शिवतीर्थ मित्र मंडळ बालाजीनगर धनकवडी पुणे या मंडळाचे अध्यक्ष यांनी मोठया प्रमाणात लाऊडस्पिकर आणुन ते लाऊडस्पिकर चालका कडुन कोणतीही पुर्व परवानगी न घेता व दिलेल्या आदेशाचे/सुचनांचे उल्लंघन करुन गणपती उत्सव साजरा करण्यासाठी साऊंड सिस्टीमचा वापर करून आवाजाची मर्यादा ओलांडली डॉल्बी सिस्टीमवर गाणी वाजवुन,सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करून,यंत्र सामुग्रीबाबत हयगयीचे वर्तन केले व येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडथळा करून धोका निर्माण केला आहे.मंडळाचे अध्यक्ष व लाउड स्पीकर चालक यांनी विहीत क्षमतेचे उल्लंघन न करणेबाबत नोटीस घेणेस नकार देवुन अटी शर्तींचा भंग केला म्हणुन यांचेविरुध्द सरकारतर्फे तक्रार आहे.

**त.अंमलदार** पो.अमंलदार एच.सी.राऊत मो.नं.७०२०८५४२७७

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**